# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त मिरा भाईंदर वसई विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड (पुर्व) ता.जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
E-mail : pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १५९-२२ दिनांक ०४/०६/२२.

### " फायरींगच्या गुन्हयातील ६ आरोपीतांना २४ तासाच्या आत पकडण्यात गुन्हे शाखेस यश."

दिनांक २/०६/२०२२ रोजी फिर्यादी याने पोलीसांना माहीती दिल्याचा कारणाचा राग मनात धरुन फिर्यादी हे रात्री ०१.०० वा. चे सुमारास मोटार सायकलने घोडबंदर येथे घरी जात असतांना, एक मोटार सायकल व चारचाकी वाहनातुन आलेल्या इसमांनी फिर्यादी यांचा पाठलाग केला. त्यामुळे फिर्यादी हे आडोश्याला लपुन राहीले. ती मोटार सायकल व चारचाकी वाहन पुढे गेल्यानंतर वैभव शेठच्या कंपनीजवळ, घोडबंदर या ठिकाणी आरोपीतांनी बंदुकीतुन दोन गोळया हवेत फायर केल्या म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्याद वरुन काशिमिरा पो.स्टे. गु.र.नं. I ३६७/२०२२, भा.ह.का.क. ३, २५ प्रमाणे गुन्हा दिनांक ३/०६/२०२२ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन व वरीष्ठ अधिकाऱ्यांना गुन्हयाबाबत माहिती देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पथके तयार करण्यात आली. सदर गुन्हयाचा घटनास्थळी तात्काळ भेटी देऊन तांत्रिक विश्लेषन व गोपनीय बातमीदार यांचेकडून आरोपीतांची ओळख पटवून आरोपीतांची शोध सुरु करण्यात आला. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेतील तपास पथकाने गुप्त बातमीदाराचे आधारे आरोपीतांचा ठावठिकाणाबाबत माहीती प्राप्त करुन त्या आधारे १) विशाल ऊर्फ गचक्या वेल्दा मुत्तुस्वामी, वय. २० वर्ष, रा. रुम नं.३ खान कंपाऊंड शनी मंदिर चौक जवळ, दहिसर पुर्व, मुंबई, २) राहुल ऊर्फ बॉक्सर शिवनाथ विश्वकर्मा, वय. २७ वर्ष, रा. जी/५०४ पुनम अवेन्यु ग्लोबल सिटी विरार पश्चिम, ३) किशोर ऊर्फ कांच्या मोहक सिंग, वय २७ वर्षे, रा.संभाजी नगर चाळ, बॉम्बे टायर्स जवळ, एस.व्ही रोड, दहिसर पुर्व, मुंबई, ४) अनुराग दिपक म्हात्रे, वय २० वर्षे, रा. जी/००१ गायत्रीधाम बिल्डींग, प्लेझंट पार्क, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे ५) अभिजीत सुधाकर पाष्टे, वय २८ वर्षे, व्यवसाय चालक, राठि. रुम नं.२०१, बी विंग, बिरदेवा अपार्टमेन्ट, चंदनसार, विरार पुर्व. यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातुन ०१ गावठी बनावटीचे पिस्टल, ०२ मॅग्झीन, ०५ जिवंत काडतुसे तसेच गुन्हा करतांना वापरण्यात आलेली होन्डा कंपनीची आय-२० चार चाकी वाहन जप्त करण्यात आलेले आहे. तसेच गुन्हे शाखा - १ यांचे तपास पथकाने आरोपी नामे विकास ऊर्फ विकी राजु निणानिया, वय. ३० वर्ष, रा. मनवेल पाडा, विरार पुर्व यास ताब्यात घेऊन त्याचेकडून डयुक कंपनीची गुन्हयात वापरलेली मोटार सायकल हस्तगत केलेली आहे. अशाप्रकारे २४ तासाच्या आत फायरींगचा गंभीर गुन्हा उघडकीस आलेला आहे.

सदरची कारवाई श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख, गुन्हे शाखा घटक -१ चे प्रभारी पो.नि.अविराज कु-हाडे, अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पो.नि./देवीदास हांडोरे, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, अमोल आंबवणे, कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, सफौ/पोशिरकर, राजु तांबे, पोहवा/जर्नादन मते, सुरेश राणे, मनोहर तावरे, थापा, गर्जे, गायकवाड, शिवा पाटील, राजविरसिंग संधु, विसपुते, पोना/लांडगे, पोअं/जगताप, प्रविणराज पवार, सुशिल पवार यांनी केलेली आहे.

------------ooooo------------